# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : १६४६/२०२१

तक्रारकर्ता, श्री.अमित राघो जाधव
मु.कोळखे, (बौध्दवाडी)
ता.पनवेल, जि.रायगड

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय कोळखे ता.पनवेल, जि.रायगड

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय कोळखे ता.पनवेल, जि.रायगड

**तक्रार सुनावणीचा दिनांक : २८/५/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| १९/४/२०२१ | ---- | २८/६/२०२१ | १९/७/२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.२९/१०/२०२१ रोजीच्या अर्जान्वये " माहिती देण्यास विलंब व कसूर केली" असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २८/५/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" सन २०१५ ते सन २०२० पर्यंत कोळखे ग्रामपंचायत हद्दीतील दिव्यांग बांधवांना निधी किती व कशा स्वरुपात वाटप केला यांचा अहवाल"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि.१९/७/२०२१ रोजी सुनावणी घेऊन, "*जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना मागविण्यात आलेली माहिती १० दिवसांत देवून तसा अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेचा आहे.*" असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, त्यांना अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही.
सुनावणीची सूचना देऊनही जन माहिती अधिकारी हे सुनावणीस अनुपस्थित आहेत.
यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने निःशुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सुहास वारे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कोळखे यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक १९/४/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपील आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२६/६/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

सही/-
(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २८ मे, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सुहास वारे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कोळखे **– यांना प्रत** –
-- गट विकास अधिकारी,
पंचायत समिती पनवेल,
ता.पनवेल जि.रायगड **यांचेमार्फत रवाना.** (गट विकास अधिकारी यांनी सदर आदेश संबंधित अधिकारी यांना बजावून पोहोच आयोगास सादर करावी.)

## विवेचन

उपरोक्त आदेशान्वये तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आले होते. सदर प्रकरणाची सुनावणी आज दि.२६/६/२०२५ रोजी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान व तत्कालिन जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, त्यांना अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही.

आयोगाच्या दि.२८/५/२०२५ च्या आदेशानुसार तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सुहास वारे, ग्रामसेवक यांचा खुलासा मागविण्यात आला होता. तथापि त्यांनी कोणताही खुलासा आयोगास सादर केलेला नाही किंवा ते सुनावणीस देखील उपस्थित राहिले नाहीत.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१) तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सुहास वारे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कोळखे यांना आयोगाने दि.२८/५/२०२५ च्या आदेशान्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम २० (१) अन्वये खुलासा सादर करण्याचे आदेश दिले होते. आजच्या सुनावणीची सूचना प्राप्त होऊनही ते अनुपस्थित आहेत तसेच त्यांनी याबाबत आयोगास लेखी खुलासा देखील सादर केलेला नाही. त्यांनी माहिती अधिकारांतर्गत करावयाच्या कार्यवाहीस महत्त्व दिल्याचे दिसून येत नाही. त्यांना दि.२८/५/२०२५ च्या आदेशातील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस कायम करण्यात येत आहे. त्यानुसार त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये रु.२५०००/- (अक्षरी रु.पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांचे वेतनातून १ मासिक हप्त्यात वसूल करुन लेखाशीर्ष क्र. ००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८०० - इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षाखाली जमा करावी. या बाबतची कार्यवाही करुन (रक्कम जमा केलेल्या चलनाच्या छायांकित प्रतीसह व्दितीय अपील क्रमांक स्पष्ट नमूद करून) पूर्तता अहवाल **गट विकास अधिकारी, पंचायत समिती पनवेल** यांनी आयोगास तात्काळ सादर करावा.

२) तक्रारकर्ता यांना अद्यापही माहिती प्राप्त न झाल्याने **गट विकास अधिकारी पंचायत समिती पनवेल** यांनी स्वत: ही माहिती संबंधित ग्रामपंचायतीकडून प्राप्त करून तक्रारकर्ता यांना १५ दिवसात पुरवावी व तसा लेखी अहवाल पुढील सुनावणीस सादर करावा.

३) प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.५/८/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २६ जून, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

१) सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग (मुख्यालय), १३ वा मजला,
नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.

२) उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ,
कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

३) गट विकास अधिकारी,
पंचायत समिती पनवेल, पनवेल, ता.पनवेल जि.रायगड

४) आस्थापना अधिकारी / आहरण व संवितरण अधिकारी,
पंचायत समिती पनवेल, पनवेल, ता.पनवेल जि.रायगड

५) तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सुहास वारे,
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कोळखे,
ता.पनवेल जि.रायगड